CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २७७ वा | बुधवार दि. २ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

### समृद्धी महामार्गावरील अपघातात २० कामगारांचा मृत्यू

**मुंबई ।** समृद्धी महामार्गावर रसत्याचं काम सुरु असताना सोमवारी मध्यरात्री मोठी दुर्घटना घडली. लॉन्चर आणि गर्डर पडल्यामुळे ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत आतापर्यंत २० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तर ३ जण जखमी झाले, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुणे दौरा पूर्ण केल्यानंतर शहापुरातील दुर्घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दुर्घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली.

## न्यूज कॉलम

### शिकारीच्या प्रयत्नात असलेल्यांना अटक

**शिरपूर ।** जंगलात शिकारीसाठी बंदूक घेऊन निघालेल्या सहा संशयितांना शिरपूर वनविभागाच्या पथकाने अटक केली. असली (ता. शिरपूर) येथील राखीव वन कंपार्टमेंट क्र.१०१७ मध्ये ही कारवाई करण्यात आली. असली येथील वनक्षेत्रात शिकारीसाठी काही जण येणार असल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. गोळीबाराचा आवाज ऐकल्यानंतर सर्वजण त्या दिशेला धावले. तेथे संशयित दुसऱ्यांदा गोळीबारकरून शिकारीच्या प्रयत्नात असल्याचे आढळले. वनविभागाच्या पथकाने ग्रामस्थांची मदत घेऊन त्यांना ताब्यात घेतले.

### निजामपूर जैताणेत पुकारला बंद

**निजामपूर ।** धुळे जिल्हा महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान व इतर सामाजिक संघटनांनी साक्री तालुक्यातील निज़ामपुर येथे मणिपूर येथे घडलेल्या अमानवीय घटनेच्या निषेधार्थ सर्व समावेशक बंद पुकारण्यात आला. परिसरातील सर्व समाज बांधव व निज़ामपुर गावातील सर्व समाज बांधव व इतर समाजाचे बांधव,व्यापारी बांधव, राजकीय, सामजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पहिला सर्जिकल स्ट्राईक शिवाजी महाराजांनी केला, ही गोष्ट कोणी विसरु शकत नाही : शरद पवार

**पुणे । प्रतिनिधी**

अलिकडच्या काळात या देशाने आणि जवानांनी देशाचं रक्षण करण्यासाठी एक प्रकारचा सर्जिकल स्ट्राईक केला होता. सर्जिकल स्ट्राईकची चर्चा आता होती. पण लाल महालात शायिस्तेखानाने ताबा घेण्याचा प्रयत्न केल्यानंतर या देशातला पहिला सर्जिकल स्ट्राईक हा शिवछत्रपतींच्या काळात झाला, ही गोष्ट कोणी विसरु शकत नाही, अशा शब्दांत शरद पवार यांनी शिवाजी महाराज यांचा गौरव केला. निमित्त होते, लोकमान्य टिळक स्मृतिदिन. या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकमान्य टिळक पुरस्कार देण्यात आला. यावेळी शरद पवार बोलत होते.

यावेळी सुरवातीलाच छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहासाची ओळख करून दिली. शरद पवार म्हणाले, या देशात पुणे शहराला अनोखे महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सर्व जगाला माहित आहे. शिवाजी महाराजांचा जन्म या जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. पुणे शहरातील लाल महालात त्यांचं बालपण गेलं. या देशात अनेक राज राजवाडे होऊन गेले. त्यांच्या नावाने त्यांची संस्थाने ओळखली जात. मोगलचे दिल्लीचे संस्थान असेल किंवा देवगिरीच्या यादवांचे संस्थाने असतील. अनेकांची संस्थाने या देशात होऊन गेली. पण छत्रपती शिवाजी महाराजांचे (हिर्ळींरक्षळ चरहरीरक्ष) राज्य हे दुसऱ्याचे राज्य नव्हते, तर स्वतःच्या बळावर उभारलेले राज्य होते. ते रयतेचे हिंदवी स्वराज्य होते. अलीकडच्या काळात देशाच्या रक्षणासाठी एक प्रकारचा सर्जिकल स्ट्राईक करण्यात आलेला होता.

सर्जिकल स्ट्राईकची चर्चा आता होते. मात्र जेव्हा लाल महालामध्ये शायिस्तेखानाने ताबा घेण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी शिवाजी महाराजांनी तो प्रयत्न हाणून पाडला. तो देशातील पहिला सर्जिकल स्ट्राईक होता, अशा शब्दांत शरद पवार यांनी शिवाजी महाराज यांचा गौरव केला. तसेच त्यानंतरच्या काळात जेव्हा देश इंग्रजांच्या ताब्यात गेला, त्यावेळी लोकमान्य टिळकांनी इंग्रजांविरुद्ध जोरदार लढा दिला, त्यांचे योगदान विसरून चालणार नाही. लोकमान्य टिळकांनी मराठी भाषेत केसरी नावाचे वृत्तपत्र सुरु केले. आणि इंग्रजांविरुद्ध लढा पुकारला. ब्रिटिशांच्या गुलाम गिरीतून बाहेर पडायचं असेल, तर आपल्याला एकत्र येऊन लढावे लागेल, असे ते म्हणायचे. वृत्तपत्रांच्या माध्यमातून टिळकांनी स्वराज्याची मशाल पेटवली, वृत्तपत्राच्या माध्यमातून ब्रिटिशांवर प्रहार केला. त्यावेळी ब्रिटिशांच्या सत्तेला आव्हान देण्याचे काम टिळकांनी केलं, जहाल गटाचे नेतृत्व लोकमान्य टिळकांनी केलं. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आणि लोकमान्य टिळक या दोघांचे योगदान विसरू शकणार नाही.



### मोदींचे मनापासून अभिनंदन

**टिळक पुरस्काराला आगळं वेगळं महत्त्व आहे. आज आपण आणि टिळक स्मारकाने पुरस्कारासाठी मोदीजींची निवड केली. या पुरस्कारांमध्ये इंदिरा गांधी, खान अब्दुल गफार खान, बाळासाहेब देवरस, शंकर दयाल शर्मा, अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंह अशा अनेक मान्यवरांची निवड झालेली आहे. या मान्यवरांच्या पंक्तीत आता पंतप्रधान नरेंद्र मोदींचा समावेश झाला, याचा सर्वांना आनंद झाला. म्हणून आमच्या सगळ्यांची वतीने त्यांची निवड झाली, त्यांना हा पुरस्कार देण्यात येतोय, त्यांचं अंत:करणापासून अभिनंदन करतो.**

### पुण्याला उत्तम नाही तर सर्वोत्तम करु; फडणवीस

**जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते नरेंद्र मोदी यांनीच पहिल्या मेट्रोचं उद्घाटन केलं आणि आज दुसऱ्या टप्प्याचंही उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात येत आहे ही मोठी गोष्ट असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पुण्याला उत्तम नाही तर सर्वोत्तम करु, असं आश्वासन पुणेकरांनी त्यांनी दिलं आहे. ते पुढे बोलताना म्हणाले की, पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनाच्या वेळी अजित पवार, एकनाथ शिंदे आणि मी होतो. मात्र त्यावेळी आम्ही वेगवेगळ्या भूमिकेत होतो मात्र सगळ्यांच्या विकासासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. आगामी काळात एकही व्यक्ती बेघर राहणार नाही, हे पंतप्रधानांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करु, असं ते म्हणाले. पुणे ही जशी उद्योग नगरी आहे तशीच स्वप्न पूर्ण करणारी नगरी म्हणूनही आम्ही पुण्याचा विकास करु, असाही विश्वास त्यांनी पुणेकरांना दिला आहे. पुणे हे राज्यातीलच नाही तर देशातील उत्तम शहर आहेत मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सर्वोत्तम पुणे करुन दाखवू, असंही ते म्हणाले.**

### पंतप्रधान देशाचे लोकप्रिय नेते : अजित पवार

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या भाषणाची सुरुवात करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींचा देशाचे लोकप्रिय नेते असा उल्लेख केला आहे. तर या कार्यक्रमावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी याचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदी हे विकास कामांसाठी पंतप्रधान नेहमी सहकार्य आणि प्रोत्साहन ते नेहमीच देत असतात असं अजित पवार यांनी म्हटलं आहे. सर्वांच्या आनंदात सहभागी झाल्याबद्दल अजित पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.**

# चोरी प्रकरणी फरार संशयितास साथीदारांसह केली अटक



**नाशिक । प्रतिनिधी**

उपेंद्र नगर परिसरातील एका बंगल्यात चोरी करणाऱ्या संशयिताला त्याच्या साथीदारांसह व लाखो रुपयांच्या मुद्देमालासह अटक करण्यात आली.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मनोहरलाल गोपीचंद गुलाटी (रा. शिवशक्ती बंगला, प्रसाद नगर, ओम कॉलणी, उपेंद्रनगर,, नाशिक) यांच्या बंगल्यात (दि.२९जुलै ) त्यांच्या ऑफिस मध्ये काम करणाऱ्या दिपक पिरुनाथ योगी याने त्यांच्या कपाटातील ३ लाख २५ हजार रुपयांची रक्कम चोरी करून फरार झाल्याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, उपायुक्त परिमंडळ २ मोनिका राउत,सहायक आयुक्त शेखर देशमुख यांनी सदरहु चोरी करणाऱ्याचा तात्काळ शोध घेऊन कारवाई करण्याचे आदेश अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक प्रमोद वाघ यांना दिले होते.

यावरून अंबड पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथकाचे अंमलदार सागर जाधव व संदिप भुरे यांना खबऱ्यांमार्फत संशयित व त्याचे साथीदार गुन्ह्यात चोरलेल्या रकमेसह गरवारे पॉईन्ट अंबड नाशिक येथे येणार आहे. यावरून गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक नाईद शेख,किरण गायकवाड,राकेश राउत, पवन परदेशी,सचिन करंजे, सागर जाधव, समाधान शिंदे, तुषार मते,घनश्याम भोये,राकेश पाटील, प्रविण राठोड, संदिप भुरे,अनिल गाढवे यांनी गरवारे पॉईन्ट येथे सापळा रचला.यात इसम नामे दिपक पिरुनाथ योगी ( २२, रा. शिवशक्ती बंगला, प्रसाद नगर, ओम कॉलणी, उपेंद्रनगर, नवीन नाशिक), निलेश बापसिंग राजपुत ( २२, रा. रूम नं ४, दुसरा मजला, मेहतर कॉम्प्लेक्स, कोटक महिंद्र बँक समोर, इंदिरानगर, नाशिक मुळ रामेधपुर सिटी, सेखाखेडी गाव, मध्यप्रदेश),राम बालुजी भिलवाडा (२३ रा रा रूम नं ४, दुसरा मजला, मेहतर कॉम्प्लेक्स, कोटक महिंद्रा बैंक समोर, इंदिरानगर, नाशिक मुळ रा- मेधपुर सिटी, लाखाखेडी गाव, मध्यप्रदेश) यांना ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन गुन्हयातील ३ लाख ५ हजार ४०० रूपये रोख रक्कम हस्तगत करून अटक केले.

# समता परिषदेने मनोहर भिडेंचा पुतळा जाळला



### देशद्रोहाचा गुन्हा दाखल करायची केली मागणी

**धुळे । प्रतिनिधी**

भिडे यांच्याकडून वारंवार महापुरुषांच्या बाबत वादग्रस्त वक्तव्य करण्यात येत आहे काही दिवसापूर्वी त्यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विषयी वादग्रस्त वक्तव्य केले. त्यामुळे समता परिषदेतर्फे मनोहर भिडे यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

यावेळी घोषणाबाजीही करण्यात आली. आता थेट देशाला स्वातंत्र्य मिळून देणारा राष्ट्रपती महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विषयी बेताल वक्तव्य केले म्हणून भिडे यांच्यावर महापुरुषांचा अपमान करीत असून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भिडे यांच्यावर गुन्हा दाखल करत अटक करावी अशी मागणी धुळे जिल्हा समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, खान्देश माळी महासंघ तर्फे करण्यात आली. यावेळी समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेश बागुल, जिल्हा सचिव बापू महाजन,दिलीप आप्पा देवरे, आण्णा माळी सर, अनिलकुमार बोरसे, ईश्वर माळी, प्रकाश शिरसाट, राजकिशोर तायडे, धीरज माळी, शिरपूर तालुका अध्यक्ष-पिंटु माळी, साक्री तालुका अध्यक्ष-रविंद्र खैरनार,चैत्राम भदाणे, चेतन खैरनार, बिपीन रोकडे,बी. एच जाधव, एस.टी.चौधरी, अमोल अहिरे,रविंद्र माळी,नवल माळी,आदि समता सैनिक उपस्थित होते.

# गावठी बनावटीचे पिस्तुल जप्त



**धुळे । प्रतिनिधी**

देवपूर परिसरातील हिम हॉटेल जवळ संशयास्पदरित्या फिरणार्या तरूणाच्या ताब्यातील गावठी बनावटीचे पिस्तुल व एक जीवंत काडतूस जप्त करण्यात धुळे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाला यश आले.

धुळे एलसीबीचे निरिक्षक हेमंत पाटील यांना आज सकाळी गुप्त माहिती मिळाली होती की, देवपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत त्रिशूल रमेश सूर्यवंशी (३२) रा.शारदा नगर, मधुबन बंगल्यासमोर, देवपूर, धुळे हा देशी बनावटीचे पिस्तूल घेवुन हॉटेल हिम परिसरात संशयास्पदरित्या फिरत आहे. त्यानुसार एलसीबीचे पोनि. हेमंत पाटील यांनी तातडीने पथकास कारवाईच्या सुचना केल्या. पथकाने लागलीच हिम हॉटेल परिसरात दाखल होत त्रिशुल सूर्यवंशी यास ताब्यात घेतले. पथकाने त्याची झडती घेतली असता ४० हजार रूपये किंमतीचे गावठी बनावटीचे पिस्तुल व एक हजार रूपये किंमतीचे जीवंत काडतूस असा एकूण ४१ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्रिशूल सूर्यवंशी याच्याविरूध्द एलसीबीचे पोकॉ.गुणवंत पाटील यांच्या फिर्यादीवरून आर्मॲक्ट ३/२५ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपास देवपूर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे एलसीबीचे पोनि. हेमंत पाटील, पोहेकॉ. मच्छिंद्र पाटील, पोना. रविकिरण राठोड, पोकॉ. निलेश पोतदार, सुशिल शेंडे, सागर शिर्के, गुणवंत पाटील यांच्या पथकाने केली.

# लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**धुळे । प्रतिनिधी**



लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त आज दुपारी फाशीपूल परिसरातील स्व.आण्णाभाऊ साठे चौकात भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, महापौर सौ.प्रतिभा चौधरी यांच्या उपस्थितीत त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या समाजोपयोगी जीवनकार्याचा गौरव उपस्थित मान्यवरांनी केला. डी.जे.वर वाजणार्या लोकगीते व पोवाड्यांनी परिसर दुमदूमुन गेला होता. फाशीपूल परिसरातील स्व.आण्णाभाऊ साठे परिसरात अभिवादन करण्यासाठी समाजबांधवांसह असंख्य मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार यांनी स्व.आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी स्व.आण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या समाजोपयोगी कार्याचा वारसा आजच्या तरूणांनी जपावा, असे आवाहन केले. यावेळी त्यांचे समवेत डॉ. सुशिल महाजन, संजय शर्मा, सुहास अंपळकर यांचेसह रामकृष्ण नेरकर, बंडुनाना गांगुर्डे, बबनराव गायकवाड, रविंद्र वाकडे, वाल्मीक जाधव, अमृत कांबळे, अनिल रामराजे, देवा कढरे, दशरथ शिंदे, संदीप पवार, अरूण वाकळे, गुलाब कदम, मयुर मासाळ, सागर आव्हाड, पप्पू वाकळे आदींची उपस्थिती होती. महापौर सौ.प्रतिभाताई चौधरी यांनी आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तरूणांनी स्व.आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याची प्रेरणा घेवुन समाजोपयोगी कामांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन महापौर सौ.प्रतिभा चौधरी यांनी याप्रसंगी केले. यावेळी त्यांचे समवेत पत्रकार सुनिल पाटील, जगदीश देवपूरकर यांचेसह इतर मान्यवर उपस्थित होते. जगदीश देवपूरकर यांनी स्व.आण्णाभाऊ साठे यांच्या पोवाड्यांचे वाचन केले. तसेच त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकीत त्यांच्या नावाचा जयघोष केला. पोवाडे,लोकगीतांनी परिसर दुमदूमुन गेला होता.

# धुळ्यात डिझेलने भरलेला टँकर उलटला

### मदत करण्याऐवजी इंधन लुटायला लोकांची झुंबड

**धुळे । प्रतिनिधी**

शहरापासून काही किलोमीटर अंतरावर डिझेलचा टँकर भररस्त्यात पलटी झाला आहे. टँकर पलटी झाल्याने संपूर्ण डिझेल रस्त्यावर सांडलं आहे. हे डिझेल पाहूण नागरिकांनी येथे मोठी गर्दी केली.

पलटी झालेल्या डिझेलच्या टँकरमधून पडणारे डिझेल गोळा करण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली आहे. मिळेल त्या भांड्यात आणि कॅनमध्ये परिसरातील नागरिकांनी डिझेल भरून नेण्यास सुरुवात केली आहे. मुंबईकडून इंदोरकडे जात असताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने मुंबई आग्रा महामार्गावर चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा डिझेल टँकर पलटी झाला आहे. या दुर्घटनेत टँकर चालक जखमी झाला असून सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्याचबरोबर अग्निशमन विभागाचे पथक देखील घटनास्थळी दाखल झाले आहे. तसेच उपस्थित नागरिकांना बाजूला करत मोठी दुर्घटना टाळण्यासाठी आपले कार्य सुरु केले आहे. सध्या पेट्रोल-डिझेलच्या किंमती गगनाला भीडल्या आहेत. महागाईने त्रस्त झालेल्या काही नागरिकांनी हे डिझेल मिळेल त्या भांड्यात भरण्यास सुरुवात केली आहे. याचे काही व्हिडिओ देखील समोर आलेत. सध्या हे व्हिडिओ व्हायरल होत आहेत. (जीजे १२/बीव्ही ०५५५) मोहाडीनजीक पलटी झाला. दुचाकीस्वाराला वाचविणाच्या प्रयत्नात टँकर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. टँकर पलटी झाल्यानंतर तो डिव्हाडरला ठोकला गेला. डिव्हाडरला लागूनच असलेला विद्युत पोलही आडवा झाला. घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती.



### डिझेल पळविण्यासाठी गर्दी

**दरम्यान डिझेल टँकर उलटल्याची बातमी धुळे शहरात पसरली. आजूबाजूच्या नागरिकांसह असंख्य नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी कुणी ड्रम, तर कुणी कॅन तर कुणी डबे घेऊन पळत होते. टँकर उलटलेल्या ठिकाणी मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळत होते. डिझेल पळवण्यासाठी जणू स्पर्धा लागली होती. प्रत्येकजण आपापली भांडी भरण्यात व्यस्त असल्याचे चित्र पाहायला मिळत होते. त्यातच काहींनी तर अक्षरशः वाहून जाणारे मातीमिश्रित डिझेल भरुन नेले. विशेष म्हणजे अगदी लहानग्यापासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनीच जास्तीचे तेल आपल्या भांड्यात कसे पडेल, यासाठी कसरत करत होते. याचवेळी रस्त्यावरुन जाणाऱ्या वाहनचालकांनी हा सर्व प्रकार आपल्या मोबाईलच्या कॅमऱ्यात कैद केला.**

# ठाकरे गटाच्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यालयाचा नकार

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

शिवसेनेत बंडखोरी झाल्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव आणि चिन्ह एकनाथ शिंदे गटाला दिले होते. आयोगाच्या या निर्णयाच्या विरोधात उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवले होते. या प्रकरणी तातडीची सुनावणी करावी, अशी मागणी ठाकरे गटाने केली होती मात्र सर्वोच्च न्यायालाने तातडीची सुनावणी करण्यास नकार दिला.

ठाकरे गटाकडून मे महिन्यात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये आमदारांच्या अपात्रतेचा निकाल लागेपर्यंत निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी केली होती. ही याचिका फेब्रुवारी महिन्यात करण्यात आली होती आणि न्यायालयाने मे महिन्यात आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभेच्या अध्याक्षांकडे सोपवला. आता शिवसेनेने आयोगाने दिलेल्या निर्णयाची तातडीने सुनावणी करण्याची मागणी केली होती. यावर निर्णय देताना सरन्यायाधिश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने म्हटले की, यावर आम्ही दोन मिनिटात निर्णय देऊ शकत नाही. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पक्ष नाव आणि चिन्हाबाबत तातडीने सुनावणी करावी अशी याचिका दाखल केली होती.

## चैतन्यपर्वाचे स्मरण

स्वत्व विसरलेला, विखुरलेला, दुभंगलेला समाज हे लोकमान्यांसमोर मोठे आव्हान होते. अनेक जय-पराजय पचवत, त्यागाच्या जखमा अंगावर घेत त्यांनी लोकमत घडविले. विचारांची स्पष्टता, साधेपणा आणि स्वार्थत्याग याद्वारे त्यांनी सर्व आव्हाने ओलांडली.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे थोर सेनानी लोकमान्य टिळक यांची आज १०३ वी पुण्यतिथी. भारतवर्षाच्या हजारो वर्षांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी जे-जे अध्याय नोंदले गेले त्यात टिळक युगाचा समावेश आहे. असे अनेक अध्याय काळाच्या ओघात इतिहासाचे भाग बनले. वर्तमानाशी त्यांचे नाते कायम राहिलेच असे नाही. लोकमान्य टिळक रूपी पर्व भारताच्या वर्तमानात अखंड प्रेरणेचे काम करीत आहे. भारताला गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी विराट चळवळ उभी करणार्या टिळकांचे विचार स्वतंत्र भारताच्या वाटचालीत प्रत्येक पावलावर मोलाचे ठरत आहेत. कोलकाता काँग्रेसद्वारे लोकमान्यांनी दिलेली चतु:सूत्री आजदेखील तेवढीच महत्त्वाची ठरावी ही बाब त्यांचे द्रष्टेपण अधोरेखित करते. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ही त्यांची चतु:सूत्री राष्ट्राच्या प्रगतीकरता सदैव आवश्यक ठरलेला मूलमंत्र! अनेक पिढ्यांच्या बलिदानातून स्वातंत्र्य मिळाले. लोकमान्यांनी आपले संपूर्ण जीवन देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिले. त्या ध्येयासाठी मंडालेचा अतिशय खडतर असा बंदिवास सहा वर्षे सहन केला. विजिगिषु वृत्तीने हा योद्धा मंडालेच्या बंदिवासानंतर पुन्हा निधड्या छातीने उभा राहिला. संपूर्ण भारत पिंजून काढत स्वातंत्र्यसंग्रामासाठी त्यांनी सर्वसामान्यांना निश्चयाने उभे केले. ही तपश्चर्या 'लोकमान्य' ठरली! या पार्श्वभूमीवर देशाच्या स्वातंत्र्याचे मोल कधीही विसरता कामा नये.

बहिष्काराचे अस्त्र प्रभावी

आधुनिक भारताचे शिल्पकार असलेले लोकमान्य टिळक स्वदेशी अर्थकारणाचा आग्रह धरीत देशाला स्वावलंबी बनविण्याचे स्वप्न पाहात होते. आज औद्योगिकदृष्ट्या भारत जगामध्ये अग्रेसर आहे. भारताची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकाची बनली आहे. याची बीजे आणि प्रेरक शक्ती लोकमान्यांच्या स्वदेशीच्या मंत्रात आहे. आपल्या उत्पादनांसाठी इतरांची बाजारपेठ मिळविणे, आर्थिक आणि त्यायोगे अन्य क्षेत्रातील वर्चस्व वाढवून त्या-त्या देशांना अंकित करणे, याच स्पर्धक देशांच्या व्यूहरचना असल्याचे आजही दिसते. याला टिळकांच्या चतु:सूत्रीतील बहिष्काराचेच अस्त्र कायमचे उत्तर ठरणार आहे! देश सामर्थ्यशाली बनविण्याचे सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण. म्हणूनच राष्ट्रीय शिक्षण काल आवश्यक होते, आज आणि उद्याही त्याचे महत्त्व अबाधित राहणार आहे. लोकमान्यांच्या तुरुंगवासाच्या काळात स्वातंत्र्याचा लढा कुंठित झाला होता. मंडालेतून सुटका झाल्यावर 'पुन:श्च हरिओम' हा त्यांनी केलेला निर्धार, त्यांनी 'गीतारहस्या'तून दिलेल्या कर्मयोगाच्या संदेशाप्रमाणेच जनमानसाला कार्यशील करणारा ठरला. स्वराज्यासाठी त्यांनी केलेली गर्जना ब्रिटिश साम्राज्याचा पाया खिळखिळी करणारी ठरली. राजेशाही रुजलेल्या, त्या व्यवस्थेतील मानसिकतेत अडकलेल्या भारतीयांना, लोक आणि लोकशाहीची संकल्पना समजावून देणारे पहिले 'महानायक' लोकमान्य हेच होते! भारताबरोबर स्वतंत्र झालेल्या आणि पुन्हा हुकूमशाहीत अडकलेल्या अन्य देशांकडे पाहता भारतीय लोकशाहीचे यश जगाला चकित करते. याचे श्रेय टिळकांचे आहे. नियतीचे कठोर आघात टिळकांएवढे अन्य कोणा युगपुरुषाच्या वाट्याला क्वचित आले असतील. देशाच्या स्वातंत्र्यापुढे त्यांनी या कशाचीही पर्वा केली नाही. स्वातंत्र्याचा उच्चार करणे कठीण असलेल्या कालखंडात स्वराज्याची गर्जना करीत कोट्यवधी भारतीयांना स्वातंत्र्यासाठी उभे करणे, स्वराज्य दृष्टिपथात नसताना देखील स्वातंत्र्यानंतरच्या बलशाली भारताचे चित्र रेखाटणे, त्यासाठी आपल्या विचार आणि कृतीतून भक्कम पाया निर्माण करणे, जीवनाचा प्रत्येक श्वास देशासाठी खर्ची घालणे, गीतारहस्याद्वारे संपूर्ण स्वातंत्र्य लढ्याला आध्यात्मिक अधिष्ठान देणे हे सारेच 'न भूतो न भविष्यती', असेच आहे. 'जिवंत व्यक्तीप्रमाणे राष्ट्रही जोपर्यंत वाढत असते तोपर्यंतच सजीव असते, वाढ खुंटली की त्याच्या र्हासास प्रारंभ झालाच' असे टिळक म्हणाले होते. वाढीचा हा आलेख कायम राखणे आणि प्रत्येक क्षेत्रात तो उंचावत नेणे यालाच आपले प्राधान्य असले पाहिजे. प्रत्येकाने राष्ट्रकार्याच्या गोवर्धन पर्वताला काठी लावली पाहिजे' हे लोकमान्यांचेच वाक्य डोळ्यासमोर ठेवून कृती केल्यास भारताचा सूर्य सार्या जगाला प्रकाश दाखविल्याशिवाय राहणार नाही. महात्मा गांधी यांनी 'भारतीयांचे आराध्यदैवत' या चपखल शब्दांत टिळकांचे वर्णन केले. त्या आराध्यदेवतेचे स्मरण देश आणि समाजाची पुढील वाटचाल कायम प्रकाशमान ठेवणार आहे.

# स्वत:चे अनैतिक संबंध मुलांवर लादणे अयोग्य!

समाजामध्ये वाढत चाललेली अनैतिकता, प्रेमाच्या आणि शारीरिक, भावनिक गुंतवणुकीच्या नावाखाली सुरू असलेला व्यभिचार, स्त्री तसेच पुरुषांनी सोडलेल्या वैवाहिक बंधनाच्या मर्यादा, समाजाची, कुटुंबाची तमा न बाळगता सुरू असलेले विवाहबाह्य संबंध, स्त्री तसेच पुरुष दोघांच्याही मुलांसाठी खूप त्रासदायक ठरत आहेत, हे समुपदेशन करताना जाणवते. आपण पालक म्हणून असेही मुलांवर अनेक गोष्टी त्यांच्या मनाविरुद्ध लादत असतोच. त्यांना विविध कारणावरून रागावणे, बोलणे, धाक दाखवणे पालक म्हणून आपले कर्तव्यच आहे. पण अनेक ठिकाणी आपल्या चुका, आपले चुकीचे निर्णय, आपल्या व्यक्तिगत सोयीसाठी, आनंदासाठी-आवडीसाठी आपण अनैतिक, चुकीच्या पद्धतीने जवळ केलेल्या व्यक्तींनादेखील आपल्या मुलांनी जवळ करावे, त्यांच्याशी चांगलेच वागावे, बोलावे, त्यांचा आदर करावा अशा अपेक्षा पालक म्हणून आपण करणे अत्यंत चुकीचे आहे. मूल लहान आहे तोपर्यंत आपल्या दबावामुळे, भीतीमुळे असं करतीलसुद्धा पण ते मोठे झाल्यावर, स्वत:च्या पायावर उभे राहिल्यावर आपण त्यांच्या नजरेतून उतरलेलो असू हे नक्की.

आर्या (काल्पनिक नाव) अकरावीत शिकणारी महाविद्यालयीन मुलगी. तिच्या बालपणीच तिच्या वडिलांचे निधन झाले होते. आई रश्मी (काल्पनिक नाव) खासगी नोकरी करून तिचा सांभाळ करत होती. रश्मीची वयोवृद्ध आई म्हणजेच आर्याची आजीदेखील त्यांच्यासोबत राहत होती. आर्याला वडिलांच्या निधनानंतर आई रश्मी हेच एक हक्काचं नातं होतं आणि या नात्यातून तिला तिच्या वयानुसार खूप अपेक्षा होत्या. आर्याला जेव्हा तिच्या वर्ग शिक्षकांमार्फत समुपदेशनासाठी आणलं गेलं तेव्हा ती खूप तणावात, खूप दबलेली, खूप शांत, नाराज वाटत होती. तिच्या ट्युशनच्या शिक्षकांनी सर्वतोपरी प्रयत्न करून तिला समजावण्याचा, विचारण्याचा प्रयत्न केला होता की, वर्गातपण ती इतकी शांत का असते, अजिबात बोलत नसते, सगळ्या मित्र-मैत्रिणीत मिसळत का नाही? हिच्या चेहर्‍यावर कधीच हसू का दिसत नाही? परंतु शिक्षकांना काहीच समजू शकलं नव्हतं. आर्या पहिल्या भेटीत तर जास्त काही बोलली नाही; परंतु दुसर्‍या चर्चासत्रात तिच्याशी खूप गप्पा मारल्यावर, ती खूप हसून खेळून मनमोकळी वागायला लागली होती. नंतर ती स्वतः वयात आल्यापासून कोणत्या आणि किती तणावात आहे, हे तिने कथन केले होते. आर्याची आई रश्मी मागील तीन-चार वर्षांपासून समीर (काल्पनिक नाव) सोबत रिलेशन शिपमध्ये होती. आर्याच्या माहितीनुसार समीर विवाहित होता, पण त्याची बायको आणि मुलगा त्याच्यापासून वेगळे राहत होते. रश्मी आणि समीरचे तीन-चार वर्षांपासून सुरू असलेले चुकीचे संबंध आर्या रोज स्वतः समोर बघत होती. समीर रोज नित्यनेमाने रश्मीच्याच घरी जेवायला, राहायला येत होता. दोघेही वृद्ध आजी आणि लहान आर्या यांच्यासमोर एकमेकांशी उघड उघड संबंध ठेऊन होते. आपल्या वृद्ध आईला काय वाटेल किंवा लहान मुलीच्या डोळ्यांसमोर असं वागणं चुकीचे आहे, याचे भान रश्मीला नव्हतं आणि समीरला तर त्याबाबत काहीही घेणं-देणं नव्हतं. आर्या आणि तिची आजी अतिशय हतबल आणि आगतिक होत्या. कारण त्या रश्मीवरच अवलंबून होत्या. समीर सतत आपल्या घरात असतो, त्याची नोकरीची वेळ संपली की, तो आणि रश्मी कामावरून निघाली की, ते दोघेही एकत्रच घरी येतात. कोणताही दिवस असो, सण असो, आर्याचा वाढदिवस असो, वा इतर काहीही खास प्रसंग असो, आर्या आजारी असो की, आजीला बरे नसो, आर्याला आणि आजीला आई म्हणजेच रश्मी कधी एकटी भेटतच नव्हती. समीर कधी आपल्या आईचा पिच्छा सोडत नाही आणि आईपण सतत त्याच्या मागे-पुढे नाचत राहते, याचा आर्याला खूप राग येत होता. सातत्याने समीरने आपल्या आयुष्यावर केलेलं आक्रमण, त्याचा आपल्या घरातील हस्तक्षेप, आपल्या घरातील त्याचा मुक्तसंचार आर्याला अजिबात आवडत नव्हता. समीर जरी आर्याला पैसे देत होता, तिला काय हवं, काय नको विचारत होता, तिला जाता-येता काहींना काही घेऊन देत होता. तरीही आर्याच्या मनात समीरबद्दल खूप कटुता होती.

समीर घरी आल्यावर आर्याचं तुटक वागणं, तोंड पाडून बसणं, त्याच्याशी नीट न बोलणं, नीट न जेवणं, हसून-खेळून न राहणं, त्या दोघांसोबत कुठेही जायला नकार देणं, मात्र रश्मीला हे पटत नव्हतं. रश्मीचा अट्टहास होता की, आर्याने समीरला बाबाच म्हटलं पाहिजे. त्याच्याशी मिळून-मिसळून राहीलच पाहिजे. त्याला आदर दिलाच पाहिजे. यासाठी ती अनेकदा आर्यावर रागावली होती. तिच्यावर चिडली होती.

आर्या सांगत होती, तो माझ्या मम्मीचा मित्र, त्याचं माझं कोणतंही नातं नाही. तो माझा बाबा नाही, मी का त्याला जबरदस्तीने बाबा म्हणू? त्या माणसामुळे मला खूप त्रास होतोय. मम्मी कामावर गेल्यावर मला आजूबाजूच्या घरातील लोकं, माझ्या मैत्रिणी विचारतात रोज तुमच्याकडे ते काका का येतात? का राहतात? ते कोण आहेत? तुझी आई कायम त्यांच्यासोबत कुठे जाते? कुठून येते? ते दोघेही दार लावून रूममध्ये का बसतात? तुमच्या घराचं दार कायम बंद का असते? ते काय करतात? ते घरात असल्यावर तुला का घराबाहेर एकटं बाहेर बसवतात? हे सांगताना आर्याला रडू कोसळलं होतं.

आर्याला आई असून सुद्धा ती पोरकेपणा सहन करत होती. आर्याची मानसिकता लक्षात घेऊन काहीतरी ठोस निर्णय या परिस्थिती बदलासाठी घेणे आवश्यक होते. रश्मीशी बोलल्यावर तिने तिची भूमिका स्पष्ट केली. रश्मीच्या मते ती समीरशिवाय जगण्याची कल्पना सुद्धा करू शकत नव्हती. तिला समीर हा उर्वरित आयुष्यासाठी एकमेव आधार वाटत होता. ती आर्यासाठी किंवा स्वत:च्या आईसाठी समीरला सोडणं अशक्य होतं. आर्याचे पुढे मागे लग्न होऊन जाणार आहे, आपली वृद्ध आई आपल्याला आयुष्यभर पुरणार नाही, समीरच आहे, जो आपल्याला शेवटपर्यंत सोबत करेल, असं तिचं मत होतं. रश्मीच्या आयुष्यात आज सगळ्यात महत्त्वाचा समीर होता. समीर पण पत्नी आणि मुलांपासून लांबच राहतोय, तर रश्मीने त्याच्याशी कायदेशीर लग्नच करायला काय हरकत आहे? असेच बेकायदेशीर एकत्र का राहता या संबंधांना काहीच अर्थ नाही, हे सांगितल्यावर रश्मीने तिच्या बाजूने समीरसोबत लग्न करून राहण्याची पूर्ण तयारी दाखवली. रश्मी म्हणाली, आम्ही लग्न केल्यावर मी त्याच्या बायको-मुलाला स्वीकारायला तयार आहे. तो त्यांना भेटू, बोलू शकतो.

समीरशी लग्नाबद्दल बोलल्यावर मात्र त्याने फोनवरच स्पष्ट शब्दांत सांगून टाकलं की, माझी बायको-मुलगा फक्त लांब राहतात. आमचा काही कायदेशीर घटस्फोट झालेला नाही. तशी कल्पना मी रश्मीला सुरुवातीलाच दिली आहे. रश्मीशी मी लग्न करण्याचा प्रश्नच येत नाही. माझ्या बायको-मुलाला स्वीकारणारी ही कोण? माझ्या लग्नाच्या बायकोला का आता माझी रखेली स्वीकारेल? रश्मीला कोणाचा आधार नाही, ती होतकरू आहे, स्वभावाने चांगली आहे, बिचारी एकटीच कमवून मुलीला, आईला सांभाळते. यामुळे तिच्या आयुष्यात थोडं फार सुख, समाधान, आनंद यावा म्हणून मी तिच्यासोबत आहे. आमच्या दोघांच्या गरजा भागतात म्हणून आम्ही एकत्र आहोत. तिला आजही सुयोग्य जोडीदार लग्नासाठी मिळत असेल, तर माझी कोणतीही हरकत नाही. तिच्या आणि मुलीच्या भवितव्यासाठी ती कोणताही निर्णय घेऊ शकते.

आता काय करायचं? ज्या समीरसाठी रश्मीने स्वत:च्या मुलीचं बालपण भरडून टाकलं होतं. स्वत:च्या वृद्ध आईला गृहीत धरलं होतं, त्याचं स्पष्ट धोरण त्याने सांगून टाकलं होतं. समीरचा निर्णय ऐकून रश्मीला फार काही फरक पडला नव्हता. आर्या तर अगदीच कोवळ्या वयात, या प्रकरणामुळे त्रस्त झालेली होती. आर्याच्या मानसिक भावनिक गरजा समजून घेऊन आईची भूमिका निभवावी, समीरशी रोज रोज स्वत:च्या घरात भेटणं थोडं कमी करावं, त्याच सारखं येणं, घरावर त्याचा प्रभाव, स्वत:च्या आयुष्यातील त्याचा प्रभाव थोडा तरी कमी करावा, स्वत:ची सामाजिक प्रतिमा सांभाळून राहावे, मुलीच्या डोळ्यादेखत एकत्र राहू नये, तिच्यासमोर ऐका रूममध्ये दार बंद करुन असताना तिला काय वाटत असेल, याचा गांभीर्याने विचार करावा. आर्यावर जबरदस्तीने समीरला बाप म्हणून स्वीकारण्यासाठी भाग पाडू नये, समीरपेक्षा आर्या रश्मीच्या म्हातारपणाचा आधार असणार आहे, आर्याच्या शिक्षकांना भेटून बोलून तिच्या निकोप मानसिक वाढीसाठी प्रयत्न करावेत, तिचा अभ्यास, आवडी निवडी, खाणंपिणं याकडे आई म्हणून वैयक्तिक लक्ष द्यावं, समीर प्रकरण थोडं मर्यादेत ठेवणंच रश्मी आणि आर्याच्या हिताचे आहे. यासारख्या मुद्द्यावर रश्मीला समुपदेशन करण्यात आले.

**- फॅमिली काऊन्सलिंग : मीनाक्षी जगदाळे**


# मन, हृदय आणि आत्म्याची शांति - संत राजिन्दर सिंह जी महाराज

बरेच लोक आपल्या व्यस्त दैनंदिन जीवनातून वेळ काढून सुट्टीवर जाऊ इच्छितात. ते आपल्या दैनंदिन जीवनातील कठीण परिश्रमांपासून दूर राहून आराम आणि मनाची शांति प्राप्त करू इच्छितात. ते नेहमीच्या अडचणी आणि चिंतांपासून दूर राहून, अशा ठिकाणी राहू इच्छितात जिथे त्यांना प्रसन्नता आणि काही दिवस आनंदाचा अनुभव होईल. प्रत्यक्षात बरेचसे लोक तात्पुरत्या वेळा करीताच नव्हे तर, सदैव शांतिचा अनुभव प्राप्त करू इच्छितात.

संत महापुरुष आपल्याला सांगतात की शांतिचे तीन स्तर आहेत. पहिला स्तर मनाची शांति, दुसरा अंत:करणाची शांति आणि तिसरा म्हणजे आत्म्याची शांति.

मनाची शांति आपल्या दैनंदिन जीवनासाठीच नव्हे तर, ती आपल्या अध्यात्मिक प्रवासासाठी आणि परमात्म्याकडे परत जाण्यासाठी फार आवश्यक आहे. जेव्हा आपण दैनंदिन जीवनाचे निरीक्षण करतो की, पूर्ण दिवसात काय काय घडलं, तेव्हा आपणांस जाणवतं की अशा अनेक घटना आहेत ज्या आपल्याला शांतिच्या अनुभवापासून दूर ठेवतात. जेव्हा आपण दिवसभरातील कामांकडे बारकाईने पाहतो की, आपण दिवसभरात काय केले? तर लक्षात येते की आपण नोकरीच्या ठिकाणी, कौटुंबिक अथवा अन्य कामकाजाच्या अडचणींमुळे अशांत किंवा व्याकुळ होतो.

ही व्याकुळता आपल्या अंतरी भय निर्माण करते की उद्या काय होईल? आणि सर्वांत मोठी भीती माणसाला मृत्यूची वाटत असते. आपण मृत्यूला घाबरतो आणि ही भीती नेहमीच आपल्याला अस्वस्थ करते आणि आपणास शांत राहण्यापासून दूर ठेवते. जगामध्ये काही लोक अशा अवस्थेतुन बाहेर येतात आणि जीवनाकडे उच्च दृष्टिकोनाने पाहतात कारण की ते आध्यात्मिक दृष्टिकोनातून आपले जीवन व्यतीत करीत असतात.



जेव्हा आपण आध्यात्मिक शिकवणुकीला आपल्या जीवनात उतरवितो तेव्हा आपल्याला आंतरिक दृष्टी मिळते, जी आपल्या मनाला खरोखरची शांति देते. अध्यात्मिक मार्ग अनुसरल्यावर आपणास असा अनुभव येतो की, मानवाचा शारीरिक मृत्यू केवळ एक भ्रम आहे. आपणांस जाणवते की आपले खरे स्वरूप मानव शरीर नसून केवळ एक आत्मा आहे, जो या शरीरात निवास करतो. यात कुठला संदेह नाही की आपले शरीर एक ना एक दिवशी नष्ट होईल. परंतु आपल्या शरीराला जीवन देणारा तो आत्मा कधीही मरत नाही. तो केवळ शरीर बदलतो जसे आपण कपडे बदलतो.

आत्मा एका शरीरातून निघून दुसर्‍या शरीरात प्रवेश करतो. आत्म्याचे स्थान दोन डोळ्यांच्या भ्रूमध्यध्यात स्थित आहे. हे तेच स्थान आहे जिथून आत्मा शरीर सोडतो आणि आंतरिक दुनियेत प्रवेश करतो. जेव्हा आपण त्या आंतरिक विश्वात जातो तेव्हा आपण प्रभूच्या दिव्य प्रकाशाला पाहतो. आपण आपल्या अंतरात आकाश, तारे, चंद्रमा, व आंतरीक सूर्याला पहात-पहात आपल्या वास्तविक अध्यात्मिक निजधामास पोहोचतो आणि तिथेच आपल्या आत्म्याचे मिलन परमात्म्याशी होते.

आपल्यापैकी प्रत्येक व्यक्ती ध्याभ्यासाद्वारे ज्योति व श्रुतीचा अनुभव करून या अध्यात्मिक भरारीचा आनंद घेऊ शकतो. जेव्हा आपण आंतरिक विश्वात प्रवेश करतो तेव्हा आपणांस मृत्युचे भय वाटत नाही. तेव्हा खात्री पटते की आपण शरीर नसून एक आत्मा आहोत जो अमर आहे.


अध्यात्मिकता आणि ध्यानाभ्यास आपल्याला केवळ मनाची शांति प्रदान करते, एवढंच नव्हे तर हृदयाची शांति देखील प्रदान करते. प्रत्येक मनुष्याला प्रेमाची आवश्यकता आहे आणि तो ते प्रेम इतरांना वाटू शकतो. अध्यात्मिक मार्ग आपल्याला शाश्वत प्रेम आणि आनंद प्राप्त करण्याचे साधन प्रदान करते. कारण परमात्म्याचे प्रेम हे स्थळ आणि वेळ या पलीकडील आहे. जे प्रेम आंतरीक ज्योतीचे दर्शन आणि नाद ऐकून अनुभवु शकतो जे नेहमी आपल्या सोबत असते.

प्रभूच्या दिव्य प्रेमाप्रती ग्रहणशील होणे म्हणजेच अध्यात्मिक मस्तीच्या सागरात डुबकी मारल्या समान आहे. जेव्हा आपणांस प्रभूचे प्रेम मिळते तेव्हा आपले हृदय शांतिने भरून जाते आणि प्रसन्नतेने नाचू लागते. आपण या प्रभूच्या दिव्य प्रेमाने ओथंबुन भरलेले आहोत आणि हळूहळू हे प्रेम आपल्याकडून इतरांपर्यंत पोहोचते कारण प्रभूच्या प्रेमाला सीमा नाही.

प्रभूच्या या दिव्य प्रेमाला प्राप्त केल्यानंतर आपला आत्मा नेहमीच आपल्या वास्तविक स्वरूपा प्रती जागृत राहतो. परमात्म्याचा तो मधुर आवाज आपल्याला बोलावीत असतो आणि आत्म्याला जागृत करण्याचा प्रयत्न करतो, जो त्याला उत्साहाने भरून टाकतो. त्यामुळे आपले जीवन बदलते. उदाहरणार्थ जसे एखादे व्हायोलिन सारखे वाद्य निरंतर गुंजणारे संगीत, कविता अथवा छंद जो परमेश्वर किंवा या प्रकृतीच्या दिसणार्‍या दिव्यतेचे दर्शन घडविते. ही एखादी अचानक घडणारी घटनाही असू शकते, ज्यामधे आपण आपल्या प्रियजनांना हरवून बसल्यावर अनुभवतो की हे शरीर आपले वास्तविक घर नाही.

तेव्हा आपल्याला समजते की आपण ना तर शरीर आहोत ना मन आहोत. तेव्हा आपला आत्मा आपल्या खर्‍या निजधामी जाण्यास व्याकुळ होतो. तेव्हा आपण अनुभवतो की आपणांस तोपर्यंत शांति प्राप्त होत नाही जोपर्यंत आत्म्याचे मिलन परमात्म्याशी होत नाही. आपण मनाची शांति प्राप्त करू शकतो, आपण अंतकरणाची शांति प्राप्त करू शकतो परंतु आत्मिक शांति तेव्हाच मिळते जेव्हा आपला आत्मा परमात्म्यात लीन होतो. जेव्हा आपण या स्थितीला प्राप्त करतो जिथे आपण आपल्या अंतरातील शांति अनुभवतो. मग ती शांति आपल्यापासून इतरांपर्यंत प्रवाहित होते. आपल्या संपर्कात येणार्‍या सर्व व्यक्ती या शांतिचा अनुभव करतात. जर आपण अंत:करणाची शांति, मानसिक शांति आणि आत्मिक शांति प्राप्त केली तर ही शांति आपल्यापासून इतरांपर्यंत प्रसारित होईल. तेव्हाच आपण आपल्या सभोवती आनंद आणि शांति प्रसारित करण्यात खूप प्रभावी होऊ शकतो.

## शब्दकोडे-१३७



आडवे शब्द

१. पहारेकरी ६. टप्प्या-टप्प्याचा प्रवास १२. माळ, हार १३. नडलेला, गरजू १४. डाळीचे कालवण १५. सांभाळ, संगोपन १७. गवताचे रुंद पान १८. वेल २०. शंभर २२. प्रचंड २४. आई २५. गगन २७. हद्दपार, वगळलेला २८. कोय २९. रोटीचे एक धान्य ३०. एक त्रिदल ३१. आवेशाने पुढे जाणे ३३. पोट ३४. सैन्याचा मालपुरवठा ३६. चिखलाची भुसभुशीत जमीन ३७. श्रीकृष्णाचे एक नाव ३८. रममाण, निमग्न ४०. कबूतर ४१. पुष्कळ ४३. हिंदुस्थानी ४५. भित्रा ४८. एक महाकाय प्राणी ४९. कुंभाराची भट्टी ५१. आत्मियता, करुणामय प्रेम ५२. पुरुष ५३. आकडेमोडीचे शास्त्र ५५. उद्योगी माणसाचा 'शत्रू' ५६. ठाकरे पुत्र ५८. भडीमार ५९. भीती ६१. रक्ताचा नात्यातील ६२. रतिचा पती ६५. आमनेसामने ६८. समुद्र ७०. ग्रामीण बोलीत तेव्हा ७१. जिम्मेदारी ७२. वेळ घालवणे ७४. अभिनेता ७५. त्वरित ७६. चप्पल ७७. गाय ७८. परंतु

उभे शब्द

१. जीभ. जिव्हा २. गाढव ३. निकट ४. दरवाजा ५. रात्र ६. हेतू-कारण ७. अंगावरील बारीक केस ८. फिर्याद, अर्ज ९. वाळवंट १०. धरण, सरोवर, विहीर इ. ११. संगीतातील एक राग १६. नकला करणारा १७. सरसरीत १९. धातूचा धागा २१. मध २२. सततचे नामस्मरण २३. प्रत्येक वर्षी २४. बिनविजेचा 'फ्रीज' २५. आपला परका अशी भावना २६. कपाळ २८. स्वाभिमानी २९. इंग्रजी आई ३१. कमीजबरोबरचे एक वस्त्र ३२. दात ३३. अगरबत्ती ३५. वेळ, फुरसत ३६. डोंगराचा तुटलेला कडा ३९. जरच्या बरोबरचा शब्द ४२. दाक्षिणात्य आमटी ४४. धनुष्यबाण ४६. भरीव नसलेले ४७. शिखराचे टोक ४९. व, आणखी ५०. कडक व चिवट ५२. एक क्षार ५४. फणसातील खाद्यभाग ५६. नाहक ५७. न्यूनता, कसर ६०. रसाळ ६१. मंत्रीमंडळ ६३. औषध ६४. हाकाटी, आरडाओरड ६६. मराठीत बाथरूम ६७. टोळी, सैन्याची तुकडी यांचा प्रमुख ६८. हिंमत, धैर्य ६९. तीव्र ऊन ७३. विहीर ७४. शर्त

## शब्दकोडे १३६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.पंतप्रधान ४.हद्दपार ६.जिन्नस ९.रटाळ १०.आले ११.जीवन १३.हजरजबाबी १५.धवल १७.साकारणे १८.बळ १९.कर्म २१.मणेर २३.सरसहा २४.कमालकिमान २६.दरदरून २७.मान २८.भागवा ३०.दया ३२.मधमाशी ३५.नवरस ३६.दशानन ३७.शिंतोडा ३८.वखार ३९.कवी ४०.अंक ४१.वाटोळा ४३.डीर ४५.बार ४६.गणेश ४८.नाचा ४९.काव ५०.शुद्ध ५१.रसदार ५४.घोरपड ५६.कोडगा ५७.जारण ५८.कडवट ६०.सव ६१.बघे ६२.चोर ६३.सरल ६५.टकटक ६७.तारकस ६८.साखर ६९.कडक

उभे उत्तर

१.पंतोजी २.प्रधान कार्यालय ३.नरमणे ४.हळहळणे ५.पाचर ६.जिलेबी ७.सर्वधर्मसमभाव ८.आकलन १०.आबाळ १२.वसा १४.जबरदस्त १९.कर २०.मकरंद २१.मन २२.रदन २३.सनई २५.मानधन २६अ.सुवास २७.माशी शिंकणे २९.गरम ३१.यादवी ३२.मनधरणी ३३.खडावा ३४.सावळा ३५.नरडीचा घोट घेणे ४०.अंग झाडणे ४२.टोकदार ४४.सवड ४७.शर ४९.कापडचोपड ५०.शुभंकरोती ५२.सजावट ५३.रण ५५.अवसर ५९.टर ६०.सकस ६४.लता ६५.टक ६६.कसा

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# नाभिक युवा सेनेतर्फे पालकमंत्री भुसे यांना विविध मागण्यांचे निवेदन

## मुख्यमंत्री शिंदे यांच्या समवेत बैठक घेणार

नाशिक । प्रतिनिधी

येथील महाराष्ट्र नाभिक महामंडळ व नाभिक युवा सेनेच्या वतीने काल नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांना नाभिक समाजाच्या विविध मागण्यांचे एक निवेदन देण्यात आले. त्यात महाराष्ट्र शासनाने नाभिक समाजासाठी स्थापन केलेल्या श्री संतसेना केशशिल्पी महामंडळाची स्थापना केली असून अद्याप त्याच्या कामकाजास सुरुवात झालेली नाही. तरी यासंदर्भात आपण व्यक्तीशा लक्ष घालून त्याची सुरुवात करावी असे निवेदनात म्हटले आहे.



तसेच नाशिक जिल्ह्यातील नाभिक समाजासाठी श्री संतसेना भवन बांधण्यासाठी शासनातर्फे जागा मिळावी, या व इतर मागण्यांसाठी शासनाकडे प्रयत्न करावेत अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदन स्वीकारल्यानंतर ना. भुसे यांनी जिल्हा स्तरावरील मागण्यांसाठी लवकरच एक बैठक घेऊ तसेच राज्य स्तरावरील मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून लवकरच त्यांच्या समवेत बैठकीचे आयोजन करू असे आश्वासन दिले.

याप्रसंगी नाभिक महामंडळाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोकराव सूर्यवंशी, विशेष निमंत्रित नारायणराव यादव, विभागीय चिटणीस दिलीपराव जाधव, युवा सेनेचे नाशिक जिल्हाध्यक्ष रोशन शिंदे, उत्तर महाराष्ट्र संघटक संजय गायकवाड, महिला जिल्हाध्यक्ष वैशाली सैंदाणे, सविता सस्कर, सिडको अध्यक्ष अशोक इशी, राजेंद्र कोरडे, रमेश आहेर, गौरव पगारे, अविनाश लोखंडे, जीवन शिंदे, हेमंत पगारे, उमेश सोनवणे, अजय निकम, सुरेश चिते, आबा महाले आदी उपस्थित होते.

# महावितरणचे मुख्य अभियंता कुमठेकर यांच्याशी आज निमात संवाद कार्यक्रम

### धनंजय बेळे यांची माहिती

नाशिक । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य महावितरणचे नाशिक परिक्षेत्राचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर हे आज बुधवार दि.२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता निमा कार्यालयात येत असून नाशिक जिल्ह्यातील विविध औद्योगिक वसाहती मधील उद्योजकांना विजे संबधित भेडसावणाऱ्या विविध समस्या संदर्भात त्यांच्याशी चर्चा करण्यात येणार आहे. तरी सर्व उद्योजकांनी उपस्थित राहून आपल्या शंकांचे निरसन करून घ्यावे, असे आवाहन निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी केले आहे.

उद्योग जगतासाठी विजेचा पुरवठा अखंडपणे सुरू राहणे गरजेचे असते. परंतु अनेकदा पूर्वसूचना न देता वारंवार विद्युत पुरवठा खंडित करण्यात येतो आणि केव्हाही शटडाऊनची घोषणा होते. त्यामुळे उद्योजकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. उद्योजकांच्या नाशिक, सिन्नर, दिंडोरी आणि जिल्ह्यातील विविध ठिकाणी झालेल्या बैठकांमध्ये उद्योजकांनी महावितरण खात्याच्या गलथान कारभाराबद्दल जोरदार टीकास्त्र सोडून आपली नाराजी व्यक्त केली आहे. महावितरणच्या सावळ्या गोंधळामुळे आम्हाला मोठा आर्थिक फटका बसतो अशा संतप्त प्रतिक्रियाही उद्योजकांनी व्यक्त केल्या आहेत. काहींनी तर आपले उद्योग अन्यत्र हलवण्याची भाषाही केली आहे. त्यामुळेच महावितरणचे मुख्य अभियंता उद्योजकांच्या शंकांचे कसे निरसन करतात? आणि त्यांना काय दिलासा देतात? हे बघणे गरजेचे असून या पार्श्वभूमीवरच बुधवारच्या बैठकीला विशेष महत्त्व असल्याचेही बेळे यांनी स्पष्ट केले.

## नवजात नकोशीला टाकले रस्त्यावर

नाशिक । शहरातील पारोळारोड चौफुलीजवळील हॉटेल पंकजच्या शेजारी आज सकाळी १५ दिवसांचे स्त्री जातीचे जिवंत अर्भक आढळून आल्याने खळबळ उडाली. येथे कोणीतरी नायलॉन पिशवीत या अर्भकाला टाकून पलायन केले. ही बाब लक्षात येताच नागरिकांनी पोलिसांना कळविले. पोलिसांनीही तत्काळ अर्भकास उपचारासाठी रूग्णालयात पाठविले. दरम्यान, हे अर्भक कोणी व का टाकले, याचा पोलिसांनी शोध सुरु केला असून परिसरातील सीसीटीव्हींची तपासणी केल जात आहे. नागपूर-सुरत या राष्ट्रीय महामार्गावरील शहरानजीक असलेल्या हॉटेल पंकजच्या शेजारी एका पिशवीत कोणीतरी नवजात अर्भकाला टाकून दिले. याप्रकरणी तालुका पोलिसात अज्ञाताविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नाशिक मनपा आणि हिरवांकुर संस्थेतर्फे वृक्ष उत्सवाची तयारी अंतिम टप्यात

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक महापालिका व हिरवांकुर यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक शहरात पहिल्यांदाच वृक्ष उत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे. वृक्ष उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. काल रोजी या उत्सवाबाबत मनपा आयुक्त यांच्या दालनात आढावा बैठक घेण्यात आली. नाशिक मनपाचे भाभानगर येथील दादासाहेब गायकवाड सभागृह येथे दि. ४ ऑगस्ट ते ६ ऑगस्ट या तीन दिवसांच्या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत प्रदर्शन भरविण्यात येत आहे.



या प्रदर्शनात देशी प्रजातीची झाडे, रोपे यांची माहिती देण्यात येणार आहे. दि. ४ ऑगस्ट रोजी नाशिक मनपाचे शालेय विद्यार्थी व शिक्षक वृक्ष दिंडीत सहभागी होणार आहेत. या दिंडीचे आयोजन मनपा शिक्षण विभागाने केले आहे. वृक्ष दिंडी रचना विद्यालय ते मुंबई नाका -दादासाहेब गायकवाड सभागृह या मार्गाने येऊन समारोप होणार आहे. तर नाशिक शहरातील सायकलिस्ट यांच्या वतीने राजीव गांधी भवन येथून सकाळी ७ वाजता मनपा प्रशासक तथा आयुक्त डॉ. अशोक करंजकर हे सायकल रॅलीला हिरवा झेंडा दाखविणार आहे. या वृक्ष उत्सव सायकल रॅलीत वृक्ष उत्सवाचा प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे. हिरवांकुर संस्थेमार्फत सकाळी दादासाहेब फाळके स्मारक पाथर्डी फाटा येथून पायी मशाल रॅली काढण्यात येणार आहे. रॅली दरम्यान देशी झाडे व रोपे यांचा प्रचार प्रसार रॅलीत सहभागी पर्यावरण प्रेमी करणार आहे. वृक्ष संवर्धनाबाबत विविध संदेश देण्यात येणार आहे. या वृक्ष उत्सवात विविध प्रकारचे स्टॉल थाटण्यात येणार असून महिला बचत गट व सामाजिक संस्थाचा सहभाग असणार आहे. नाशिक शहरातील सर्व नागरिकांनी वृक्ष उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासक तथा आयुक्त डॉ.अशोक करंजकर यांनी केले आहे.

बैठकीस उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, उपायुक्त श्रीकांत पवार, शहर अभियंता शिवकुमार वंजारी, अधीक्षक अभियंता उदय धर्माधिकारी, शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील, घनकचरा व्यवस्थापक डॉ. कल्पना कुटे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, उद्यान अधीक्षक विवेक भदाणे, कार्यकारी अभियंता रवींद्र धारणकर, कार्यकारी अभियंता जितेंद्र पाटोळे, मिळकत विभागाचे व्यवस्थापक जयवंत राऊत आदी अधिकारी उपस्थित होते.

# अण्णाभाऊ साठे थोर समाजसुधारक होते- घोलप

### शिवसेना ठाकरे गटातर्फे अभिवादन कार्यक्रम

नाशिक । प्रतिनिधी

अण्णाभाऊ साठे हे थोर समाजसुधारक आणि लेखक होते. औपचारिक शिक्षणाचा अभाव असूनही मराठीत त्यांनी ३५ कांदबऱ्या लिहिल्या. त्यांनी कुशाग्र अक्षरज्ञान प्राप्त केले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना ते गुरू मानायचे, असे प्रतिपादन माजी मंत्री आणि शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते बबनराव घोलप यांनी केले.

शिवसेना ठाकरे गटातर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जीपीओसमोरील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी घोलप बोलत होते. यावेळी उपनेते सुनील बागुल, सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख विजय करंजकर, महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर, माजी आमदार वसंत गिते, माजी महापौर विनायक पांडे, उप महानगरप्रमुख संदेश फुले, विधानसभा प्रमुख बाळासाहेब कोकणे, संपत जाधव, विभाग प्रमुख पवन मटाले, बाळासाहेब आठवले, बाळासाहेब कांबळे, महिला आघाडीच्या कीर्ती निरगुडे तसेच शिवसैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिक मनपातर्फे अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन





नाशिक । प्रतिनिधी

नाशिक महापालिकेच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी बीडी भालेकर हायस्कूल शेजारील त्र्यंबकरोड नाशिक येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्यास व मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन स्वागत कक्ष येथे साठे यांच्या प्रतिमेस प्रशासक तथा आयुक्त डॉ.अशोक करंजकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, डॉ. विजयकुमार मुंडे, श्रीकांत पवार, नितीन नेर, शहर अभियंता नितीन वंजारी, अधीक्षक अभियंता उदय धर्माधिकारी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन रावते, सहाय्यक संचालक नगर रचना हर्षल बाविस्कर, कार्यकारी अभियंता अविनाश धनाईत, बाजीराव माळी, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, स्वीय सचिव दिलीप काठे, वाल्मीक ठाकरे, विभागीय स्वच्छता निरीक्षक संजय गोसावी, नितीन गंभीरे, भास्कर गवारे, सोनल पवार, हुसेन पठाण, सागर पीठे, वीरसिंग कामे, विश्वास कांबळे, देविदास पगारे, बाळू आठवले, अजय रोकडे, रविंद्र सुरवसे, विजय नाडे, प्रदीप साळवे, सचिन हिवाळे, बापू सपकाळ, किशोर शिरसाठ, किरण जाधव, विकी शेळके, आकाश पांजगे, संतोष खरात आदींसह अधिकारी, कर्मचारी, नागरीक उपस्थित होते.

# अॅड.उमाकांत घोडराज यांना सोल्जर ऑफ कॉन्स्टिट्यूशन पुरस्कार प्रदान

धुळे । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वकीलीच्या शताब्दी निमित्त दि.२८जुलै रोजी कल्याण येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे ऑल इंडिया फेडरेशन ऑफ डव्होकेटस् अँड असोसिएशन्स, न्यू दिल्ली यांचेकडून असोसिएशनस् चे अध्यक्ष ड.रवी प्रकाश जाधव, वरिष्ठ उपाध्यक्ष अॅड.प्रकाश राजाराम जगताप यांनी उत्कृष्ट वकिली करणाऱ्या देशातील १०१ वकिलांना सोल्जर ऑफ कॉन्स्टिट्यूशन पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्यात सोल्जर ऑफ कॉन्स्टिट्यूशन पुरस्कार धुळे येथील जिल्हा व सत्र न्यायालयात व शहादा येथील न्यायालयात वकिली व्यवसाय करणारे धुळे जिल्हा वकील संघाचे सन्माननिय कार्यकारणी सदस्य अॅड.उमाकांत घोडराज यांना उत्कृष्ट वकील म्हणून सोल्जर ऑफ कॉन्स्टिट्यूशन पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.



कर्नाटक, झारखंड, दिल्ली, उत्तरप्रदेश, राजस्थान, तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्हातील एकूण १०१ उत्कृष्ट वकिली करणाऱ्या वकील बंधू-भगिनींचा सोल्जर ऑफ कॉन्स्टिट्यूशन या पुरस्काराने सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वकीली विषयी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व वक्ते अॅड.ए.एस.गजानन चव्हाण (मा. अध्यक्ष, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा) अॅड.गोपाळ भगत (उल्हासनगर) ड.खरात (सोलापूर) ड.राजेश झाल्टे (जळगांव)ड.प्रशांत बाविस्कर (जळगाव) अॅड.सत्य प्रकाश गौतम (दिल्ली) ड.मदनलाल कलकल (दिल्ली)ड.राजकुमार भारत (औरंगाबाद) अॅड.अनिल वैद्य (मा. न्यायाधिश)ड.राहुल मखरे (पुणे) ड.संजय मोरे (सरकारी वकील) अॅड. रोशन लाल (दिल्ली)अॅड.संघराज रुपवते (मुंबई), अॅड.वासवाणी (मुंबई)अॅड. रंजना भोसले (पुणे) अॅड.गुलाबराव अवसरमल (मा. न्यायाधिश),अॅड. विलास नाईक (अलिबाग) अॅड. डॉ.डि.के.सोनवणे (मा.न्यायाधिश) अॅड.जयमंगल धनराज (मुंबई) अॅड. डॉ. रमेश राठोड (नागपूर) अॅड. प्रेमनाथ पवार (नाशिक)अॅड.किरण चन्ने (भिवंडी) अॅड.बबनराव बनसोडे (कल्याण) अँड.मंजू खोब्रागडे (कल्याण)ड.सुहास रावळे (परभणी) ड.धनंजय पाटील (कळवण) ड.शंकर रामटेके (कल्याण)आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे वकील बंधू भगिनींचा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावर आधारीत शिवसोहळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गांधीजी यांच्यात झालेल्या पुणे करारावर आधारित द स्पिरीट ऑफ बाबासाहेब या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे सदस्य अॅड.डॉ. सुनिल नागेश भालेराव यांनी केले.सदर कार्यक्रमात देशभरातून वकील बंधू भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

---

अॅड. निखिल रविंद्र भावसार, धुळे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९१८/२०२३

श्री. रमेश सखाराम मिस्त्री उर्फ मोरे वै. ....**अर्जदार**

**॥ विरुद्ध ॥**

कै. सखाराम नथ्थु मोरे उर्फ सुतार उर्फ मिस्त्री (मयत) ...**मयत**

ज्याअर्थी की, अर्जदार नं. १ श्री. रमेश सखाराम मिस्त्री उर्फ मोरे, २. हिराबाई लक्ष्मण मिस्त्री आणि ३ ताराबाई पितांबर वाघ उर्फ मिस्त्री हे कै. सखाराम नथ्थु मोरे उर्फ सुतार उर्फ मिस्त्री यांची मुल व मुली आहेत. तर जाबदेणार नं. १ . श्री . साहेबराव सखाराम मिस्त्री उर्फ मोरे, २अ. विनाबाई शांताराम मिस्त्री उर्फ मोरे आणि २ब. गोकुळ शांताराम मिस्त्री उर्फ मोरे हे कै. सखाराम नथ्थु मोरे उर्फ सुतार उर्फ मिस्त्री यांची सुन व नातु आहेत. कै. सखाराम नथ्थु मोरे उर्फ सुतार उर्फ मिस्त्री यांचे दि. १६/१/२००४ रोजी मौजे मौजे बोरीस ता. जि. धुळे येथे निधन झालेले आहे. अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदारने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. ३१/०८/२०२३ रोजी मे. कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दिनांक - ३१/०७/२०२३ आदेशावरुन

शिक्का

व. लिपीक — दिवाणी न्यायाधीश, व. स्तर धुळे.
अधिक्षक — दिवाणी न्यायाधीश, व. स्तर धुळे.

---

अॅड. सिध्दार्थ जे. हसवाणी
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.५वे सह दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात**

कि.दि.अर्ज नं. ९०८/२०२३

१) पारस दलीचंद जैन
२) शकुंतला दलीचंद जैन
३) मिलिंद दलीचंद जैन तीघे रा. मु.पो. वरखेडे ता. जि. धुळे
४) संगीता छोटूलाल जैन
रा. २३५१, मेन रोड, ता. चोपडा जि. जळगाव ....**अर्जदार**

**आणि**

कै. दलीचंद सोनालाल जैन
शेवटी राहणार :- रा. मु.पो. वरखेडे ता. जि. धुळे ....**मयत**

ज्याअर्थी वरील अर्जदार मयत कै. दलीचंद सोनालाल जैन यांचे वारस आहेत.. मयत कै. दलीचंद सोनालाल जैन यांचे दिनांक १८/०४/२०१७ रोजी निधन झाले. मयत कै. दलीचंद सोनालाल जैन यांच्या वर नमुद कायदेशीर वारस यानात्याने शासकीय व निमशासकीय तसेच महसुल आणि इतर स्वराज्य संस्था येथे उपयोगासाठी अर्जदारांच्या नावाने हेअरशीप सर्टिफिकेट मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी वर नमुद केलेल्या नुसार मयतांचा वारसाबाबत हेअरशीप सर्टिफिकेट अर्जदार यांचे नावे देण्यास कोणाचीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी दि. ३०/०८/२०२३ रोजी १० वाजता वर निर्दोष्ठ केलेल्या कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून मांडाव्यात अन्यथा अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे हेअरशीप सर्टिफिकेट देण्याबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

आदेशावरुन

शिक्का

कामगिरी कारकून — दिवाणी न्यायाधीश, व. स्तर धुळे.
अधिक्षक — दिवाणी न्यायाधीश, व. स्तर धुळे.

---

अॅड. दिनेश वसंतराव गायकवाड, धुळे
निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९१६/२०२३

हबीब अब्दुल कादर शुकरी उ.व.-७० वर्ष,धंदा-सेवानिवृत्त
रा.३ फ्लोर, साउत वेस्ट कार्नर रुम, ओल्ड बिल्डींग,
नागपाडा नेबरह्यड हाउस, १०९ सोफिया जुबेर रोड,
नागपाडा, पोलीस स्टेशन समोर, भायकला मुंबई
ह. मु. ३९४, लॅमीग्टन चेंबर्स, मुंबई ४, मुंबई ....**अर्जदार**

**॥ विरुद्ध ॥**

कै. जमीला रमजान मोहम्मदी ....**मयत**
**कुणीही नाही** ...**सामनेवाला**

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट तखख, १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठीचा

ज्याआर्थी अर्ज़दाराने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. धुळे दि.२४/७/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ९१६/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VII, १८२७ चे कलम प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठीचा अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम स्वरुपी राहत असून अर्जदार यांची बहिण कै. जमीला रमजान मोहम्मदी यांची मुत्यु दि. १२/१०/२०१८ रोजी चाळीसगांव रोड, राजवाडे नगर, धुळे येथे झाला आहे. त्यांचा वारसा दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. ०८/०९/२०२३ ही निश्चित केली आहे.त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबतकाही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्थर सो कोर्ट नं. ४ यांचे न्यायालयात निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक : ३१/०७/२०२३

शिक्का

व. लिपीक — दिवाणी न्यायालय, धुळे
अधिक्षक — दिवाणी न्यायालय, धुळे

## न्यूज कॉलम

### विश्व मानव रुहानी केंद्र दहिवद तर्फे आरोग्य तपासणी

**शिरपूर ।** विश्व मानव रुहाणी केंद्र दहिवद तर्फे कोळशापाणी गावात मोफत आरोग्य तपासणी शिबिरात १३८ रुग्णांची तपासणी करण्यात येऊन त्यांना औषधोपचार देखील करण्यात आले. २३ जुलै २०२३ रविवार रोजी विश्व मानव रुहाणी केंद्र दहिवद तर्फे कोळशापाणी या गावात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात एकूण १३८ रुग्णाची तपासणी करून त्यांना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मोफत औषधी देण्यात आली. या प्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी या समाजसेवेच्या कार्याचे कौतुक केले. या कामी डॉ. निनाद हर्षद शाह यांनी आरोग्य निदान केले. अश्विन गोविंद पाटील, दिव्यांग राजेंद्र खैरनार (फार्मासिस्ट) यांनी औषध वितरण केले.

# आनंद खेडे येथे गुलाब बाबा मंदिर परिसर सुशोभीकर कामाचे भूमिपूजन

**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे आनंदखेडे येथे ग्रामदैवत गुलाब बाबा मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी नागरी सुविधा कार्यक्रमांतर्गत रुपये दहा लक्ष निधी मंजूर करण्यात आला. सदर कामाचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्राध्यापक अरविंद जाधव आणि माजी कृषी सभापती तथा कुसुंबा गटातील विद्यमान जि प सदस्य श्री संग्राम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य श्री आशुतोष पाटील, भाजपा नेते श्री किशोर सिंघवी, गटनेते तुळशीदास अहिरे, सरपंच मनीषा अहिरे, उपसरपंच साहेबराव मोरे, सोमनाथ बागुल,किरण थोरात, निलेश नवसारे, मनोज गवते, पूजा कोळी, प्रमोद शामराव शिंपी, देवेंद्र हरी कोळी, धनंजय घरटे, पितांबर आबा कोळी, भिकन गवते, बबूता बंजारा, डॉ. बोथरा, सुखदेव पाटील ,दादाभाई मोरे, संदीप पाटील, गोजर मोरे, रविकांत सानप, बभूता चव्हाण, प्रमोद जाधव ,धनराज घरटे, सुभाष गवते, पितांबर कोळी, भटू भोई आदी उपस्थित उपस्थित होते.

माजी कृषी सभापती तथा कुसुंबा गटातील विद्यमान जि प सदस्य श्री संग्राम पाटील यांनी आनंदखेडे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्या माध्यमातून नूतन शाळा मंजूर करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारात देखील आवश्यक कामे पूर्ण करण्यात आली आहे. येथील ग्रामदैवत गुलाब बाबा मंदिर परिसर सुशोभीकरणाची ग्रामस्थांची सातत्याने मागणी होती. त्याची दखल घेत जि प सदस्य श्री संग्राम पाटील यांनी नागरी सुविधा कार्यक्रमांतर्गत गुलाब बाबा मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी रुपये दहा लक्ष निधी मंजूर केला. या कामाचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्राध्यापक श्री अरविंद जाधव, जि प सदस्य श्री संग्राम पाटील, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना श्री संग्राम पाटील म्हणाले की, मतदारसंघातील शेती, सिंचन, शिक्षण, आरोग्य यासह मूलभूत विषयांवर माझे प्राधान्याने लक्ष आहे. विशेषतः आनंद खेडेगावाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून स्थानिक ग्रामस्थांची सकारात्मक भूमिका असल्याने विकासाच्या विविध योजना ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध आहे. आगामी काळात वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून विकास कामे करण्यावर माझा भर राहील असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# पिक विम्यासाठी ३ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ आ.पाटील यांच्या मागणीला यश

**धुळे । प्रतिनिधी**

पिका विमा भरतांना अर्ज प्रक्रीया करतांना शेतकर्यांना येणार्या अडचणींमुळे पिक विमा भरण्याच्या मुदतीत वाढ करण्यात यावी, त्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे मुदतवाढीचा मागणी प्रस्ताव सादर करावा अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी विधानसभेत पाँईट ऑफ इम्फॉर्मेशनच्या माध्यमातून २६ जुलै रोजी केली होती. या मागणीला यश आले आहे. पिक विमा भरण्याच्या मुदतीत वाढ मिळाली असून आता दि.३ऑगस्टपर्यंत शेतकर्यांना आपला पिक विमासाठी आपला अर्ज करता येणार आहे. त्यामुळे शेतकर्यांना दिलासा मिळाला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, दि.३१ जुलैपर्यंत शेतकर्यांना आपला पिक विमा भरण्याची मुदत दिली होती. सदर पिक विमा भरण्याच्या मुदतीत वाढ करण्यात यावी त्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे मागणी करावी अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी मुंबईत सुरु असलेल्या विधानसभेतील पावसाळी अधिवेशनात दि.२६ जुलै रोजी केली होती. यावेळी मागणी करतांना आ.कुणाल पाटील यांनी पाँईट ऑफ इम्फॉर्मेशनचा मुद्दा मांडतांना सांगितले होते की, पिका विमा भरण्याची अर्ज प्रक्रीया करतांना शेतकर्यांना असंख्य तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सातबारा उतारा काढतांना वारंवार तांत्रिक कारणाने ऑनलाईन साईट बंद होते. तसेच अर्ज भरतांना आधार पडताळणी होत नाही अशा विविध तांत्रिक अडचणी येत असतात त्यामुळे शेतकरी तासन तास ई-सेवा केंद्रावर बसूनही पिक विमा भरण्याची अर्ज प्रक्रीया होत नाही त्यामुळे अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने पिक विमा भरण्याच्या मुदतीत वाढ करण्याबाबतची विनंती केंद्र सरकारला करावी. अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी केली होती. शेतकर्यांना दिलासा मिळाला असून जिल्हयातील शेतकर्यांना आ.कुणाल पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# खंबाळे येथे पटेल माध्यमिक विद्यालयात ७ विद्यार्थिनींना सायकल वाटप

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील खंबाळे येथे आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात ७ विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले. खंबाळे येथे आजूबाजूच्या परिसरातून मुली शिक्षणासाठी येतात. त्यापैकी काही गावांना एस.टी. बस जात नाही. शाळेपासून ५ कि.मी. अंतरावरील गावातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून शासनाच्या मानव विकास मिशन अंतर्गत इयत्ता ८ वीत शिकत असलेल्या मुलींना मोफत सायकल वाटप करण्यात आले.



पंचायत समिती शिरपूर येथील गटशिक्षणाधिकारी जी.एल.सुरवाळकर, शिक्षण विस्तार अधिकारी एफ.के. गायकवाड, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. निता सोनवणे, आंबे केंद्र प्रमुख ऋषिकेश कोळी, प्राचार्य आर.एन.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम खंबाळे शाळेत संपन्न झाला. कार्यक्रमाला खंबाळे येथील सरपंच सतीबाई आसाराम पावरा, सामाजिक कार्यकर्ता आसाराम पावरा, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनेश पावरा, व्ही.एस.बेलदार यांच्या हस्ते सायकल वाटप कार्यक्रम संपन्न झाला. नंदिनी पावरा (जामन्यापाडा), प्रीती पावरा, संजीवनी पावरा, लक्ष्मी पावरा, सुजिता पावरा (सर्व रा. धवळीविहीर) राहबाई पावरा, दीपाली पावरा (रा. अमरीशनगर) या ८ वी च्या एकूण ७ मुलींना याचा लाभ मिळाला. कार्यक्रम यशस्वितेसाठी डी.ए.पावरा, एस.डी.पाटील, आर.यु.पवार, आर.एल. तवर, चुनीलाल पावरा यांनी प्रयत्न केले.

### श्रीराम कॉलनीत गढूळ पाणीपुरवठा

**धुळे ।** देवपूर भागातील श्रीराम कॉलनी व परिसरात तब्बल दहाव्या दिवशी पाणीपुरवठा झाला. मात्र, नळांना गढूळ पाणी आले. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळ्यात साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. यात गढूळ व दूषित पाण्यामुळे विविध आजार बळावण्याच्या शक्यतेत अधिकच भरच पडली आहे. महापालिकेने या समस्येकडे लक्ष घालून समस्या दूर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे रोगराई निर्माण होण्याचा धोका आहे.नाहक त्रास सहन करावा लागतोय. शहरातील नळाला गढूळ पाणीपुरवठा होत आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर असतानाच सोशल मिडियावरही पाणीप्रश्नाचा विषय मोठे चर्चेचा बनला आहे.

# प्रभाग ६ मध्ये विकासकामांचा शुभारंभ

**धुळे । प्रतिनिधी**

किरण अहिरराव यांच्या यशस्वी पाठपुराव्याने प्रभागात विकासकामे लागोपाठ सुरू आहेत. आज भगवान सोसायटीतील दुर्गामाता मंदीर परिसरात पेव्हर ब्लॉक कामासह काँक्रीटीकरण रस्ता, गटारी, पाण्याची पाईपलाईन, पथदिवे इतर मुलभूत सुविधाचे लोकार्पण परिसरातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले.



गेल्या २५ ते ३० वर्षांपासून महिंदळे गावाचा विस्तार झपाट्याने वाढला आहे. साक्रीरोडच्या दक्षिणेकडे व सुरत बायपासला लागून ५० कॉलन्यांच्या विस्तार झालेला आहे. महिंदळे ग्रामपंचायत होती तेव्हापासून या कॉलन्यांचा विकास खुंटलेला होता. या भागात कोणतीही मुलभूत सुविधा म्हणजे रस्ता, पाणी,गटारी, पथदिवे या सुविधा उपलब्ध नव्हते. प्रभाग ६ मधील नगरसेवक किरण अहिरराव यांच्यावर जनतेने विश्वास टाकत त्यांना एकमताने निवडुन दिले. किरण अहिरराव यांनी जनतेच्या विश्वासाला तडा जावु नये याकरीता आजवर मनपाच्या माध्यमातून अनेक विकास कामे केलीत.परिणामी, आजमितीस या कॉलन्यांचे भाग्य उजळले आहे. आज भगवान सोसायटीतील दुर्गामाता मंदीर परिसरातपेव्हर ब्लॉक कामासह काँक्रीटीकरण रस्ता, गटारी, पाण्याची पाईपलाईन,पथदिवे इतर मुलभूत सुविधाचे लोकार्पण परिसरातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रदीप महाजन, राजेंद्र पाटील, संजय पाटील, हिम्मत आखाडे, गोकुळ पाटील, नितीन भामरे, सोनु भामरे, महादेवनंदन, विठोबा धनगर, अभिमन्यू पगारे, मनोज मराठे, मुकूंदा पगारे, भूषण सुर्यवंशी, सोनु पाटील, रवींद्र पाटील, संजय वाघ, सतिष वाघ, अनुराग जाधव, कविता वाघ, सुवर्णा वाघ, मंगला महाजन, जिजाबाई पाटील, सविता पाटील, निर्मिलाबाई आखाडे, आशाबाई पाटील, भारती भामरे, सुलचना भामरे, विमलबाई नंदन, मनिषा धनगर, गंगुबाई पगारे, कोमल मराठे, सीमा पगारे, नंदिनी जाधव, सोनाली पाटील व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# बोरकुंड विकासोच्या चेअरमनपदी अनिल भदाणे बिनविरोध

**धुळे । प्रतिनिधी**

बोरकुंड येथील न्यू बोरकुंड विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी अनिल भदाणे यांची तर व्हा. चेअरमनपदी राजेंद्र माळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. बोरकुंडचे प्रथम लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब भदाणे यांच्या विकासाच्या पॅटर्नवर विश्वास दाखवत, बोरकुंड सोसायटीत ग्राम विकास पॅनलचे सर्व उमेदवार निवडून आले आहेत. बोरकुंड, रतनपुरा व होरपाडा कार्यक्षेत्र असलेल्या या सोसायटीवर बाळासाहेब भदाणे मित्र परिवार गटाने पुन्हा एकदा निर्विवाद वर्चस्व सिध्द केले आहे.



बोरकुंड विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमन व व्हा.चेअरमन पदाची निवडणुक नुकतीच संपन्न झाली. यात चेअरमन व व्हा.चेअरमन पदासाठी अनुक्रमे, अनिल भदाणे व राजेंद्र माळी यांचा उमेदवारी अर्ज भरला. दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकेक अर्ज आल्याने निवडणुक निर्णय अधिकार्यांनी अनिल भदाणे व राजेंद्र माळी यांना अनुक्रमे चेअरमन व व्हा. चेअरमन म्हणुन घोषीत केले. यावेळी सोसायटीचे संचालक अर्जुन सुकलाल माळी, गंगाधर बाबुराव माळी, अर्जुन निंबा माळी, अनिल गुलाबराव पाटील, अशोक दिनकर पाटील, राजेंद्र दौलत माळी, चंद्रशेखर सुपडू भदाणे, हिरालाल नाना पाटील, दगडू गुलाब अहिरे, पुष्पाबाई डिगंबर पाटील, शकुंतलाबाई कौतिक माळी, रावसाहेब झगा गढरी, वाल्मीक दौलत माळी, आदी उपस्थित होते.

### पोदार स्कूलमध्ये दीक्षान्त समारंभ

**धुळे ।** शहरातील पोदार स्कूलमध्ये २७ जुलैला ईसीसीईडच्या विद्यार्थ्यांचा दीक्षान्त समारंभ झाला. ज्योती शिंदे प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे प्राचार्य भूषण उपासनी, मुख्याध्यापिका कुमुदिनी भामरे, संस्थेचे ॲडमिन ऑफिसर अनिल कुलकर्णी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. डिप्लोमा इन अर्ली चाइल्डहूड केअर न्ड एज्युकेशन हा एक वर्षाचा डिप्लोमा अभ्यासक्रम आहे.

# जागतिक स्तनपान जागृती सप्ताह साजरा

**जैताणे । प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य केंद्र जैताने अंतर्गत उपकेंद्र निजामपूर येथे दि ०१ ते ७ ऑगस्ट जागतिक स्तनपान जागृती सप्ताह साजरा करण्यात आला.

या वेळी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.हितेंद्र गायकवाड यांच्या सूचनेनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र जैताणे येथील आरोग्य अधिकारी डॉ गायत्री अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्तनपान या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.प्राथमिक आरोग्य केंद्र जैताणे येथील आरोग्य कर्मचारी के वाय शिंदे, आरोग्य सहाय्यक सी जे सोनवणे, आरोग्य सेवक श्रीमती एस. बी चव्हाण, आरोग्य सेवीका गटप्रर्वतक रत्ना जाधव उपस्थित होते.



# राज्य किक बॉक्सिंग स्पर्धेत मुंबईचे खेळाडू चमकले

**मुंबई । प्रतिनिधी**

ऑल महाराष्ट्र राज्य ज्युनियर किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२३ राजाराम भिकू पाटील स्टेडियम, खर्डी, पुणे येथे किकबॉक्सिंग खेळाचा थरार रंगला. या स्पर्धेसाठी राज्यभरातून ३५ जिल्हे व १३३० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.



किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्राने आयोजित केलेल्या या स्पर्धे त मुंबई शहरातील शितो रियू स्पोर्ट्स कराटे अँड किक बॉक्सिंग असोसिएशन, स्पोर्ट्स किक बॉक्सिंग असोसिएशन मुंबई शहर आणि चित्ता मार्शल आर्ट्सच्या युवा फायटर्सनी सहभाग घेऊन ६ सुवर्ण पदके ७ रौप्य पदके व ९ कांस्य पदके पटकावत चमकदार कामगिरी केली. विजयी खेळाडूंनी त्यांच्या यशाचे श्रेय त्यांचे प्रशिक्षक - उमेश मुरकर, विघ्नेश मुरकर, रोहित भंडारी, राहुल साळुंखे आणि साहिल बापेरकर, भूपेश वैती यांच्या समर्पण आणि मार्गदर्शनामुळे विजयाचा मार्ग मोकळा केला. त्याच बरोबर रेक्स मेलगिब्सन, विन्स पाटील, यशराज शर्मा यांनी स्पर्धेत रेफेरी म्हणून काम पहिले.

किक बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिशन महाराष्ट्र चे अध्यक्ष नीलेश शेलार यांनी झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रिय ज्युनिअर किक बॉक्सिंग स्पध्ये करिता सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. गुरूकुल कृती फाउंडेशन ट्रस्टच्या उदार पाठिंब्याने या तरुण खेळाडूंना तयार करण्यात, त्यांच्या प्रतिभेला आणि स्पर्धेपूर्वीच्या स्वप्नांना जोपासण्यात मोलाची भूमिका बजावली. सर्व विजेत्यांनी आणि सहभागींनी विविध प्रकारात त्यांच्या अदम्य भावनेचे आणि खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन केले. मुंबई शहराचा किकबॉक्सिंग पराक्रम पूर्वीपेक्षा अधिक उजळ झाला आहे. सुवर्ण पदक विजेते - आलोक ब्रीद ( क्रिएटिव्ह फॉर्म व लाईट कॉन्टॅक्ट दोन्ही प्रकारात), बुरहानुद्दीन रंगवला, बुरहानुद्दीन आत्थर (पॉइंट फाइट), झैनाब बारोट ( लो किक), अलिफिया कपाडिया ( किक लाईट ), रौप्य पदक विजेते - दुर्वा गावडे, आलोक ब्रीद, (पॉइंट फाइट), शिद्धत गुप्ता, आली असगर सुतरवाला, बुरहानुद्दीन रंगवला, विरागी धरमशी, ( लाईट कॉन्टॅक्ट), सारा कागलवाला (लो किक). कांस्य पदक विजेते - कशिश जैस्वार, मानसी पटवा, यथार्थ बुडमला ( क्रिएटिव्ह फॉर्म), ग्रिशम पटवर्धन, अनिकेत जैस्वार, देवांश झा, आराध्या परब, आलिफिया कपाडिया (पॉइंट फाइट), बुरहानुद्दीन अत्थर (लाईट कॉन्टॅक्ट).कृशांक गोसावी, यज्ञेश खाडे यांनी सहभाग घेतला.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था

Admission Open

विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे

NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111

B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.

डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत

संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A

B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.

सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.

प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053

P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology

पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.

संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344

प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735, प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक लक्ष महाराष्ट्र





बुधवार, दि. २ ऑगस्ट २०२३

# मध्य नाशिकमध्ये शासन आपल्या दारी अभियानात ५००० लाभार्थ्यांचा सहभाग

















नाशिक। मध्य

नाशिक मतदार संघाच्या आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी शालिमार परिसरातील नेहरू गार्डन समोर राबवलेल्या शासन आपल्या दारी अभियानास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यात विविध लाभार्थ्यांना एकाच छताखाली शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. या अभियानात सुमारे ५००० लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात, तहसीलदार बहिरम यांच्यासह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि शहरातील मान्यवर उपस्थित होते. शासकीय निर्धारित शुल्कात २०० हून अधिक योजनांचा लाभ कमीत-कमी कागदपत्रांत या अभियानात देण्यात आला. यावेळी बोलताना आ. फरांदे यांनी सांगितले की, बर्याचदा सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरे झिजवावे लागतात. तसेच वेगवेगळी कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने लाभार्थ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात खर्च होतो. याच पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ राज्यातील सर्वसामान्य जनतेपर्यंत एकाच छताखाली पोहचवण्यासाठी शासन आपल्या दारी अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्यात येत आहेत. सरकारी योजनांचा लाभ घेताना येणार्या अडचणी कमी करण्यासाठी हे अभियान राबवण्यात येत आहे. लाभार्थ्यांच्या प्रस्तावांना जलद मंजुरी दिली जाणार आहे, असेही आ. फरांदे म्हणाल्या.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र






# सहकार चळवळ टिकावी यासाठी सामुहिक प्रयत्न आवश्यक :ना. भुजबळ


























त्र्यंबकेश्वर । राज्यातील सहकार क्षेत्राने देशाला दिशा दिली आहे. मात्र या सहकार क्षेत्रात काही मंडळींनी स्वाहाकार केल्याने राज्यातील सहकार अडचणीत आले आहे. त्यामुळे अडचणीत आलेला हा सहकार पुन्हा वाढवायचा असेल तसेच ही चळवळ टिकावी यासाठी तर सर्वांनी एकत्रित येऊन सामुहिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन पुणे, श्री.महारुद्र हनुमान नागरी सहकारी पतसंस्था सातपूर नाशिक व नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने त्र्यंबकेश्वर येथे दोन दिवसीय सहकार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते सहकार मित्र पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आ. हिरामण खोसकर, नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले, राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, महारुद्र पतसंस्थेचे संस्थापक सदाशिव माळी, परसराम गिरी महाराज, नारायण वाजे, ड.अंजली पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, कार्याध्यक्ष गोरख बोडके, गोविंद माळी, श्रीराम मंडळ यांच्यासह पदाधिकारी व सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की,  सन १९१२ साली सहकारी संस्थांचा कायदा सावकारीतून सामान्य जनतेची मुक्तता, सहकार चळवळीला प्रोत्साहन आणि त्या माध्यमातून आर्थिक प्रगतीला हातभार लागावा, या उद्देशाने राजर्षी शाहूंनी हिंदुस्थान सरकारचा १९१२ चा को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायदा सर्व कलमांसह १ जून १९१३ रोजी करवीर संस्थानात लागू केला. महाराष्ट्रात छत्रपती शाहू महाराजांपासून सहकाराची सुरुवात झाली. ही सहकार चळवळ पुढे वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील ते आता शरदचंद्र पवार यांनी रुजविली असल्याचे त्यांनी सांगितले.